संदर्भ (औविअ) क्रमांक ०३/२०१०. **निशाणी क्र.–४९.**

.............................................................. ....

डीलावल प्रा. लि. x फिरोज हजरत मुलाणी

द्वितीय पक्षाचा साक्षीदार क्र. २

मी शपथपूर्वक सांगतो की,

नांव :– रामचंद्र बाजीराव नांगरे, वय :– ६७ वर्षे

व्यवसाय :– सेवानिवृत्त. रा.:– ओगलेवाडी, ता. कराड, जि. सातारा.

**<u>अर्जदाराकरीता अर्जदार साक्षीदार क्र. २ चा शपथेवर</u>**

**<u>सरतपास विधीज्ञ श्री. आर. पी. जाधव यांचेद्वारा.</u>**

१. मी डी लावल कंपनीमध्ये सन १९९२ पासून २६/०६/२००९ पर्यंत कार्यरत होतो. १९९२ पासून ऑक्टोबर १९९९ पर्यंत मी Servicing Incharge होतो. त्यानंतर सन नोवहेंबर १९९९ ते २००१ पर्यंत मी सहाय्यक सुपरवायजर म्हणून Milking विभागात कार्यरत होतो. त्यांनतर २००१ पासून ते २६/०६२२००९ पर्यंत मी मिल्कींग विभाग इन्चार्ज होतो.

२. डी लावल कंपनीमध्ये Milking Machine, Water Bowl, Feeder Rack, Partition इ. उत्पादनाचे काम चालत होते. जून २००९ मध्ये कंपनी बंद पडली. त्यावेळी कंपनीत १०० पेक्षा जास्त कामगार काम करत होते.

३. मी महेश दिनकर लोहार, फिरोज हजरत मुलाणी, अमोल बाळासाहेब जाधव, विलास दादू पाटील, रमेश विठ्ठल मुळे, कृष्णराव श्रीरंग पवार आणि संतोष रामचंद्र शिंदे या कामगारांना ओळखतो. सदरचे कामगार कंपनीत सन २००० ते २००२ पासून कंपनीत कार्यरत होते. त्यांनी ऑगस्ट २००८ पर्यंत कंपनीत काम केले होते. कंपनीच्या कायम कामगारांच्या बरोबरीने हे कामगार कंपनीत काम करत होते. सदरचे कामगार कंपनीत Drilling, Machining, Fitting, Painting, Polishing, Buffing, Finishing आणि Installation, Servicing इ. प्रकारचे काम करीत होते. कंपनीमधील कायम कामगारदेखील हेच काम करीत होते.

प्रश्न :– कंपनीमध्ये वरील कामगारांची नेमणूक कोणी व कशी केली होती ?

(या प्रश्नावर प्रथम पक्ष कंपनीच्या विधीज्ञांनी आक्षेप नोंदविला की, सदर साक्षीदार कामगारांच्या नेमणूक प्रक्रियेचा भाग नसल्यामुळे सदरचा प्रश्न Relevant नाही.)

**आदेश**

सदर साक्षीदार कंपनीमध्ये कार्यरत असल्याबाबत किंवा त्यांचा कंपनीसोबत संबंध असल्याबाबत त्यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. जोपर्यंत प्रथमदर्शनी असे दिसत नाही की, सदर साक्षीदार कंपनीमधील कर्मचारी होते व त्यांचा वरील कामगारांसोबत काम करण्याचे कार्यक्षेत्र होते तोपर्यंत सदर साक्षीदाराला वरील कामगारांच्या नेमणूक व service condition बाबत पुरावा देणे योग्य होणार नाही.

४. डीलावल कंपनीमधील Milking Department चे काम माझ्या देखरेखीखाली चालत होते. वरील कामगार माझ्या नियंत्रणाखाली कंपनीत काम करीत होते. कामगारांनी कंपनीत काम केल्याबाबत त्यांचे जॉब कार्ड भरण्यात येत होते. कामगारांनी दिवसभरात केलेल्या कामाची नोंद कामगार जॉब कार्डमध्ये करत होता.

५. वरील नमूद कामगारदेखील जॉब कार्ड भरत होते. त्या जॉब कार्डवर कामगारांव्यतिरिक्त इतर कोणाच्याही नोंदी नमूद नसायच्या. त्या जॉब कार्डवर माझ्या सहया असायच्या. मला आता यादी **निशाणी–४५** सोबत दाखल जॉब कार्ड दाखविण्यात आले. त्यावर माझ्या सहया दिसून येत आहेत.

**उलटतपास – विधीज्ञ श्री. पंकज मोहोळकर यांचेमार्फत**

**तोंडी विनंतीवरून पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

समक्ष / श्रवणोत्तर स्वीकृत
वा.दा.व.अ.क.के

ठिकाण – सातारा.
दिनांक –०६/०२/२०२६.

( निखिल अ. गुप्ता )
पिठासीन अधिकारी,
कामगार न्यायालय, सातारा.